(ESTD. 1965)
Gondia Education Society's
SETH NARSINGDAS MOR COLLEGE OF ARTS & COMMERCE &
SMT. G. D. SARAF SCIENCE COLLEGE
Tumsar-441912 (M.S.) Dist. Bhandara
Ph. No. Office : (07183) 233300 Res. : (07183) 233301
Email - principalsnmorcollege@rediffmail.com, snmorcollege1965@gmail.com website : snmorcollege.org.in

Ref. No. : SNMC/2023-24 Date : 15.05.2023

# मराठी विभागातर्फे मेहेगाव येथे भाषिक सर्वेक्षण

एस. एन. मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरीदेवी सराफ विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभागातर्फे दि. ४ मे २०२३ रोजी तुमसर तालुक्यातील मेहेगाव येथे भाषिक सर्वेक्षणार्थ भेट देण्यात आली. ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांच्या मराठी भाषेसंदर्भातील भाषिक अडचणी जाणून घेणे हा या सर्वेक्षणाचा मुख्य हेतू होता. भाषा अभ्यास व भाषिक ज्ञानाचा ग्रामीण लोकांशी अनुबंध तपासणे तसेच मराठी प्रमाणलेखनाचे ज्ञान तपासण्याच्या दृष्टीने सुद्धा हा भाषिक सर्वेक्षणाचा उपक्रम महत्त्वाचा होता.

या सर्वेक्षणामध्ये एक प्रश्नपत्रिका तयार करून ग्रामीण भागातील लोकांकडून त्याची उत्तरे घेण्यात आली. या प्रश्नांमध्ये प्रमाण मराठी भाषेतील अत्यंत सुलभ शब्दांचे अर्थ विचारण्यात आले होते. परंतु ग्रामीण लोकांच्या जनजीवनावर झाडीबोलीचा अधिक प्रभाव असल्याने प्रमाण भाषेतील शब्दांचा अर्थ समजण्याइतके ज्ञान बहुसंख्य लोकांकडे नाही, असे लक्षात आले. एकूण उत्तरदात्यांपैकी २५% लोकांना प्रमाण भाषेचे प्राथमिक ज्ञान आहे व ७५% लोक प्रमाण भाषेतील शब्दांपासून अपरिचित आहेत, असे आढळले. या प्रश्नांमध्ये काही प्रश्न मराठी प्रमाणलेखनाशी संबंधित असून एकूण उत्तरदात्यांपैकी २०% उत्तरदात्यांना मराठी प्रमाणलेखनाचे किमान ज्ञान असून ८०% उत्तरदात्यांना याविषयी किमान ज्ञान नाही, असे आढळले.

मराठी भाषेला समृद्ध करण्याकरिता लोकभाषा, प्रादेशिक भाषा व बोलीभाषांना स्थानिक अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची आवश्यकता आहे, असे या सर्वेक्षणातून लक्षात आले. या सर्वेक्षणामध्ये एकूण २५ उत्तरदात्यांकडून उत्तरे घेण्यात आली. मराठी विभागप्रमुख डॉ. रेणुकादास उबाळे, डॉ. राजेश दिपटे आणि बी. ए. तृतीय वर्षातील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते. तसेच मेहेगाव गावातील गावकर्यांनी या उपक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले.




Patanjali Farm
MAITRI CYBER CAFE
Google
Unnamed Road, Hasara, Maharashtra 441912, India
Hasara
Maharashtra
India
2023-05-04(Thu) 09:33(am)
30°C
86°F


CP4G+FGF, Mehegaon, Maharashtra 441912, India
Mehegaon
Maharashtra
India
2023-05-04(Thu) 09:35(am)
30°C
86°F
Google


Unnamed Road, Hasara, Maharashtra 441912, India
Hasara
Maharashtra
India
2023-05-04(Thu) 09:39(am)
30°C
86°F
M/S CHAUDHARI SAW MILL
Google